**प्रेसनोट दि. १३.०६.२०२३**

**लोकसेवक श्री. बाळासाहेब शंकर जगताप, वय-५७ वर्षे, तलाठी करजगी, ता.जत, जि.सांगली राहणार मु.पो. आसंगी, गुड्डापूर रोड ता.जत जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी करून ५०,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडलेबाबत सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

यातील तक्रारदार यांचे घराचे बांधकाम सुरू असून बांधकामा करीता आणलेली वाळू ही बेकायदा वाळू साठा केली आहे असे सांगून बेकायदा वाळुची साठवणुक केली म्हणून कारवाई न करण्यासाठी श्री. जगताप, तलाठी करजगी यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. १२.०६.२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे दि.१२.०६.२०२३ रोजी पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे घराचे बांधकाम सुरू असून बांधकामा करीता आणलेली वाळू ही बेकायदा वाळू साठा केला आहे असे सांगून वाळुची बेकायदा साठवणुक केली म्हणून कारवाई न करण्यासाठी तलाठी श्री. जगताप, सजा करजगी यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी असल्याचे निष्पन्न झाले आहे आहे.

त्यानंतर आज दि. १३.०६.२०२३ रोजी लोकसेवक तलाठी श्री. जगताप यांचे राहते घराचे ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री. जगताप, तलाठी करजगी यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ५०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. बाळासाहेब शंकर जगताप, वय-५७ वर्षे, तलाठी करजगी, ता.जत, जि.सांगली राहणार मु.पो. आसंगी, गुड्डापूर रोड ता.जत जि.सांगली यांचेविरुध्द उमदी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

सदर आरोपी लोकसेवक यांना यापुर्वी दि.०७.०७.२०१४ रोजी तक्रारदार यांचे खरेदी दस्ताची नोंद घेवून सातबारा उतारा देण्यासाठी १०,०००/- रूपये लाचेची रक्कम घेताना रंगेहाथ पकडण्यात आले होते. त्यावेळी त्यांचेविरूद मिरज शहर पोलीस ठाणेस भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा करणेत आला होता. सदरची केस सद्या न्यायप्रविष्ठ आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, ऋषीकेश बडणीकर, अजित पाटील, सलिम मकानदार, सुदर्शन पाटील, रविंद्र धुमाळ, पोपट पाटील, सिमा माने, उमेश जाधव, रामहरी वाघमोडे, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली ★ सत्यमेव जयते

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner